## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा)
## जनसंपर्क विभाग

==========================================================================

**जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/१५१६/२०१९** दि. **१८ सप्टेंबर, २०१९**

**प्रति,**

**मा. संपादक / मुख्य बातमीदार / ब्युरो चिफ**

-----------------------

-----------------------

**<u>प्रसिद्धी पत्रक</u>**

**ना. म. जोशी मार्ग, परळ बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प**

**पात्र भाडेकरूंची पुनर्वसन सदनिकेच्या वितरणासाठी नोव्हेंबरमध्ये संगणकीय सोडत**

**मुंबई, दि. १८ सप्टेंबर , २०१९ :-** ना. म. जोशी मार्ग , परळ येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्यांतर्गत संक्रमण गाळ्यात स्थलांतरीत झालेल्या पात्र भाडेकरूंना प्रस्तावित पुनर्वसित इमारतीतील सदनिका वितरीत करण्याकरिता म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळातर्फे नोव्हेंबर महिन्यातील पहिल्या आठवड्यात संगणकीय सोडत काढण्यात येणार आहे. अद्यापपर्यंत १४६ पात्र भाडेकरू/रहिवाशांचा संक्रमण गाळ्याचा करारनामा पंजीकृत करून त्यांना संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्यात आले आहे.

मुंबईतील ना. म. जोशी मार्ग - परळ, नायगांव आणि वरळी येथील बी . डी. डी. चाळींच्या पुनर्विकासाची प्रक्रिया जलद गतीने होण्याकरिता राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्च स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला की, सोडतीत निश्चित झालेल्या लाभार्थ्यांसह मुंबई मंडळातर्फे पुनर्वसन सदनिकेबाबत कायदेशीर करारनामा पंजीकृत करण्यात येईल. सदरील बैठक दि. ११/०९/२०१९ रोजी राज्याचे गृहनिर्माण मंत्री तथा सहअध्यक्ष उच्च स्तरीय समिती श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. दि. ३१/१०/२०१९ पर्यंत म्हाडाच्या संक्रमण गाळ्यात स्थलांतरित होतील, अशा लाभार्थ्यांना म्हाडाच्या संगणकीय सोडतीत समाविष्ट केले जाणार आहे.

कृ. मा. प.

बीडीडी ना. म. जोशी मार्ग, परळ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील पात्र भाडेकरू (लाभार्थी) समवेत संक्रमण गाळ्याचा करारनामा पंजीकृत करण्याबाबत कार्यवाही करण्याचे काम सुरु आहे. आतापर्यंत १४६ लाभार्थी म्हाडाच्या संक्रमण शिबीरात स्थलांतरित झाले आहेत. उर्वरित लाभार्थ्यांची स्थलांतरणाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे, अशी माहिती मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. बी. राधाकृष्णन यांनी दिली.

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

==========================